# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर

## मानव्यशास्त्र विद्या शाखा (HUMAN FACULTY)

### अभ्यासक्रम : बी.ए. : मराठी साहित्य / B. A. SYLLABUS MARATHI LIT. (OPT.)

**B. A. I Semester : Syllabus**

**बी. ए. प्रथम सत्र : अभ्यासक्रम**

**मराठी साहित्य (ऐच्छिक) : Marathi literature**

---

अभ्यासक्रमाची उद्दिष्टे :

१. बी.ए. भाग १ ते ३ या तीन वर्षात विद्यार्थ्यांना मराठी साहित्यातील विविध वाङ्मयप्रकारांचा व प्रवृत्ती-प्रवाहांचा काही निवडक प्रातिनिधिक साहित्याकृतींच्या अभ्यासाद्वारा परिचय करून देणे.
२. मराठी साहित्यातील निवडक साहित्यकृतींची व संबंधित वाङ्मयप्रकारांची आशय व अभिव्यक्तींच्या संदर्भात विस्ताराने ओळख करून देणे.
३. मराठी साहित्य व मराठी भाषा याविषयींची प्रगल्भ अभिरुची विकसित करणे.
४. साहित्याचा आस्वाद घेण्याची व त्याचे स्थूलमानाने मूल्यमापन करण्याची क्षमता विकसित करणे.
५. साहित्याच्या अभ्यासातून जीवनविषयक व सामाजविषयक जाण विकसित करणे, प्रगल्भ करणे.
६. प्राचीन ते अर्वाचीन अशा मराठी वाङ्मयपटाची स्थूलपणे त्यांना ओळख करून देणे.
७. पदव्युत्तर वर्गातील मराठी साहित्याच्या सूक्ष्म व सखोल अभ्यासाची पार्श्वभूमी बी.ए. भाग १ ते ३ च्या तीन वर्षांच्या अभ्यासक्रमातून निर्माण करणे.
८. मराठी भाषिक कौशल्ये आणि वाङ्मयीन कौशल्ये ह्यांची ओळख करून देणे आणि त्यांचे ज्ञान विद्यार्थ्यांमध्ये विकसित करणे.
९. मराठी भाषिक कौशल्यांच्या व्यावहारिक उपयोजनाची जाण विकसित करणे.
१०. वाङ्मयासंबंधीच्या विविध मूलभूत संज्ञा-संकल्पनांचा परिचय करून देणे व त्याविषयींची मूलभूत आवश्यक जाण निर्माण करणे.

अभ्यासक्रमाची फलश्रुती

१. पदवीच्या तीन वर्षात विद्यार्थ्यांना मराठी साहित्यातील विविध वाङ्मयप्रकारांची तोंडओळख होईल आणि मराठी साहित्यविषयक ज्ञानाने ते संपन्न होतील.
२. मराठी साहित्यातील निवडक व महत्त्वपूर्ण साहित्यकृतींचे ज्ञान विद्यार्थ्यांना होईल.
३. मराठी भाषा आणि मराठी साहित्य याविषयीच्या प्रगल्भ अभिरुचीचा विकास त्यांच्यामध्ये होईल.
४. साहित्यकृतींचा आस्वाद घेण्याची आणि त्यांचे स्थूलमानाने मूल्यांकन करण्याची क्षमता विद्यार्थ्यांमध्ये विकसित होईल.
५. मराठी भाषेच्या विविध कौशल्यांची ओळख होऊन त्याविषयींची जाण त्यांच्यामध्ये विकसित होईल.
६. मराठी भाषेतील वाङ्मयीन कौशल्यांचे, तंत्रांचे व शैलीवैशिष्ट्यांचे प्राथमिक ज्ञान विद्यार्थ्यांस प्राप्त होईल व त्याचा प्रत्यक्ष उपयोग करण्यास ते सक्षम होतील.
७. मराठी भाषिक कौशल्यांचे व्यावहारिक उपयोजन करण्यास विद्यार्थी सक्षम होतील.
८. मराठी वाङ्मयातील महत्त्वपूर्ण संज्ञा-संकल्पनांचे पायाभूत ज्ञान प्राप्त होऊन त्याआधारे मराठी भाषेच्या प्रत्यक्ष व्यवहारातील वापरास विद्यार्थी सक्षम होतील.

९. साहित्याच्या अभ्यासातून विद्यार्थ्यांची जीवनविषयक व सामाजविषयक जाण विकसित व प्रगल्भ होईल.
१०. मराठी साहित्याच्या अभ्यासातून विद्यार्थ्यांमधील संवेदनशीलता आणि मानवतावादी दृष्टीकोण व्यापक व प्रगल्भ होण्यास मदत होईल.

**घटक एक :**

I) आत्मचरित्र : एक वाङ्मयप्रकार : संकल्पना, स्वरूप, उगम आणि विकास
II) आत्मचरित्र वाङ्मय प्रकाराची घटकतत्त्वे व वैशिष्ट्ये
III) मराठीतील आत्मचरित्र वाङ्मय : ऐतिहासिक वाटचाल

**घटक दोन :** माझी जन्मठेप (आत्मचरित्र) वि.दा.सावरकर
(परचुरे प्रकाशन मंदिर, मुंबई)

I) माझी जन्मठेप : कथावस्तू , आणि विविध व्यक्तिरेखा
II) माझी जन्मठेप : आशय, प्रतिपाद्य आणि जीवनदर्शन
III) माझी जन्मठेप : निवेदनशैली, संवादशैली, भाषाशैली आणि अभिव्यक्ति वैशिष्ट्ये

**घटक तीन :** प्रतिभा साधन - ना. सी. फडके
(देशमुख अॅन्ड कंपनी पब्लिशर्स प्रा. लि. पुणे)

या ग्रंथातील खालील दोन प्रकरणे अभ्यासक्रमात राहतील.

I) विषयाचे औचित्य
II) ललित वाङ्मयाचे स्वरूप व कार्य

**घटक चार :** मराठी भाषेचे उच्चारशास्त्र

I) मराठी वर्णमाला आणि त्यांची उच्चारस्थाने
II) उच्चारानुसारी लेखन पद्धती
III) मराठी स्वरांची उच्चार पद्धती
IV) शुद्ध उच्चारण आणि ~~शुद्धलेखन~~ प्रमाणलेखन : अनुबंध

**संदर्भ ग्रंथ :** (केवळ अतिरिक्त संदर्भासाठी)


१. आत्मचरित्र मीमांसा - डॉ. आनंद यादव
२. चरित्र आणि आत्मचरित्र - अ.म.जोशी
३. चरित्र आणि आत्मचरित्र : साहित्य स्वरूप - डॉ. सदा कऱ्हाडे
४. आत्मचरित्र : तंत्र आणि इतिहास - अ.म.जोशी.
५. प्रदक्षिणा खंड १ व खंड २ - कॉन्टिनेन्टल प्रकाशन
६. सुगम मराठी व्याकरण व लेखन - मो. रा. वाळंबे
७. मराठी लेखन मार्गदर्शिका - यास्मिन शेख


०००

29/07/2022

## बी.ए. सत्र दोन (Semester II)

## अभ्यासक्रम : मराठी साहित्य (ऐच्छिक)

**घटक एक :**

I) नाटक : कलाप्रकार आणि वाङ्मयप्रकार : संकल्पना व स्वरूप

II) नाटकाचे विविध घटक

III) मराठी रंगभूमीचा स्थूल आढावा.

**घटक दोन :** नटसम्राट (नाटक) - वि. वा. शिरवाडकर

(पॉप्युलर प्रकाशन, मुंबई)

I) नटसम्राट : कथावस्तू व इतर व्यक्तिरेखा

II) नटसम्राट : प्रतिपाद्य, आशय आणि शोकात्मिका

III) नटसम्राटची शैली वैशिष्ट्ये

**घटक तीन :** प्रतिभा साधन - ना.सी.फडके

प्रस्तुत सत्रात या पुस्तकातील खालील दोन प्रकरणे अभ्यासात राहतील.

I) समर प्रसंग

II) व्यक्तिदर्शन

**घटक चार :** वाङ्मयीन संकल्पना : वाचन व आकलन

I) 'वाङ्मय' आणि 'साहित्य' : संकल्पना व भावार्थ

II) प्राचीन, मध्ययुगीन व अर्वाचीन : कलितक संकल्पना

III) प्रमुख मराठी वाङ्मयप्रकार : संकल्पना व स्पष्टीकरण (काव्य, कथा, कादंबरी व नाटक)

IV) आधुनिक मराठी साहित्य : संकल्पना व अर्थपरीघ

**संदर्भ ग्रंथ :** (केवळ अतिरिक्त संदर्भासाठी)


१. नाटक : एक चिंतन - वसंत कानेटकर
२. मराठीचे नाट्यतंत्र - मो.द.ब्रह्मे
३. शोकनाट्याचे साहित्यरूप - सदा कऱ्हाडे
४. नाट्यविमर्श - के. नारायण काळे
५. मराठी नाटक आणि रंगभूमी (दोन्ही खंड) - वि.भा.देशपांडे
६. साहित्यविचार : अरविंद वामन कुलकर्णी
७. साहित्यशास्त्र : स्वरूप आणि समस्या - वसंत पाटणकर


○○○